**परराष्ट्र व्यवहार आणि पर्यावरण, वन आणि हवामान बदल राज्यमंत्री, श्री. कीर्ती वर्धन सिंह यांची म्यानमारला भेट (08 - 11 एप्रिल 2026)**

06 एप्रिल 2026

म्यानमार सरकारच्या (GoM) निमंत्रणावरून, परराष्ट्र व्यवहार आणि पर्यावरण, वन व हवामान बदल राज्यमंत्री श्री कीर्ती वर्धन सिंह हे 10 एप्रिल 2026 रोजी नेप्यिडॉ येथे आयोजित रिपब्लिक ऑफ द युनियन ऑफ म्यानमारच्या नवीन राष्ट्राध्यक्षांच्या शपथविधी समारंभास उपस्थित राहण्यासाठी, 08-11 एप्रिल 2026 या कालावधीत म्यानमारच्या भेटीवर असतील.

2. आपल्या भेटीदरम्यान, श्री. सिंह हे नेप्यिडॉ येथे GoM मधील संबंधित मान्यवरांची भेट घेतील; तसेच सध्या सुरू असलेल्या व्यापार, आर्थिक आणि विकास सहाय्याशी संबंधित उपक्रमांविषयीच्या द्विपक्षीय चर्चासत्रांमध्ये सहभागी होतील आणि यंगून येथे परदेशस्थ भारतीय सदस्य व भारतीय मित्रमंडळ सदस्यांशी संवाद साधतील, अशी अपेक्षा आहे.

नवी दिल्ली

06 एप्रिल 2026